# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १२, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३)** | **कृषी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५६**

---

## चंद्रभागा नदी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) पात्रातील अवैध वाळू उपशामुळे चार शाळकरी मुलांचा झालेला मृत्यू

**(१) * ८६२६९ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रभागा नदी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) पात्रातील अवैध वाळू उपशा विरोधात विविध संघटनांनी दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास प्रांत कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वाळू उपशामुळे चंद्रभागा नदीच्या पात्रात मोठे खड्डे पडले असून या खडयात पडून चार शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार चंद्रभागा नदी पात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील चंद्रभागा नदीपात्रात दि.१०/०६/२०१७ रोजी पाण्यात पोहत असताना ४ बालकांचा बुडून मृत्यु झाला असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. तथापि, सदरची घटना घडलेल्या ठिकाणी वाळूचे उत्खनन झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सोलापूर जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध घालण्याकरीता उपविभागीय स्तरावर तसेच तहसील स्तरावर महसूल विभाग व पोलीस विभागाचा समावेश असलेली भरारी पथके गठित करण्यात आली आहेत. सदर भरारी पथकांमार्फत पंढरपूर तालुक्यात माहे एप्रिल, २०१७ ते माहे जून, २०१७ या कालावधीत वेगवेगळ्या प्रकरणांत कारवाई करून रू.१८,७८,७७१/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आला आहे. तसेच १७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) समुद्र किनाऱ्यालगतची शासकीय जमीन मच्छिमार बांधवांना हस्तांतरीत करण्याबाबत

**(२) * ८८१९२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) समुद्र किनाऱ्यालगतच्या सर्वे नं.१९३ मधील जागेचा वापर अलिबाग कोळीवाड्यातील मच्छिमार बांधव व्यवसायासाठी सुमारे २०० वर्षापासून करीत असून तेथील घरांना घरपट्टी, पाणीपट्टी, वीज जोडणी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमिनीवरील मच्छिमारांना जवळपास २०० वर्षानंतर जागा खाली करण्याबाबत नोटीसा देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समुद्र व खाडी किनाऱ्यालगत असलेल्या शासकीय जागा मच्छिमार बांधवांच्या मच्छिमार व्यवसायासाठी हस्तांतरीत करण्याचा शासन निर्णय असतानाही त्याची अंबलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन समुद्र किनाऱ्यालगतची शासकीय जमीन मच्छिमार बांधवांना हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड येथील स.नं.१९३ क्षेत्र ६-३५.२७ हे-आर या जमीन मिळकतींचे गा.न.नं.७/१२ चे कब्जेदार सदरी "कस्टम व सेंट्रल डिपार्टमेंट" यांचे नावे दाखल आहे. उक्त जमीन ही अलिबाग नगर परिषद हद्दीमध्ये येत असून कस्टम विभागाच्या नांवे असलेल्या जमिनीवर मच्छिमार बांधवांनी बांधलेल्या घरांबाबत नगर परिषद अलिबाग यांचेकडून असेसमेंट मध्ये 'अनधिकृत' नोंदी दाखल करुन त्यांच्याकडून घरपट्टी व पाणीपट्टी वसूल केली जात असल्याचे दिसून येते.

(२) उक्त जमिनीवरील अनधिकृत घर धारकांना सदरील जागा खाली करण्याबाबत कस्टम विभाग, अलिबाग यांनी नोटीसा बजावल्या आहेत.

(३) शासन परिपत्रक दिनांक ०४.०२.१९८३ मधील तरतुदीनुसार मच्छिमारांच्या गावालगतच्या/वसाहती लगतच्या खुल्या सरकारी जागा मच्छिमारांना व्यवसायाकरिता तसेच मासे सुकविणे, जाळे सुकविणे, जाळे विणणे, बोटी दुरुस्ती करणे, बोटी शाकारणे इ.करिता निहीत करण्यात येतात. अशा जागांची मालकी शासनाचीच असते, परंतु स्थानिक लोकांना अशा जागेचा वापर फक्त उक्त सार्वजनिक कारणासाठीच करता येते. त्यानुषंगाने रायगड जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यात येत असून जिल्ह्यातील समुद्र किनारी असलेल्या एकूण ११ तालुक्यातील १६६ गावांपैकी २४ गावांची एकूण क्षेत्र ४५.३९१३ हे.आर क्षेत्राचे अधिकार अभिलेखात शासन परिपत्रक दिनांक ०४.०२.१९८३ अन्वये इतर हक्कांमध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लिगंदरी ते आडगाव माऊली (जि.औरंगाबाद) या घाट रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३) * १०७९८ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लिगंदरी ते आडगाव माऊली (जि.औरंगाबाद) या घाट रस्त्याचे काम सन २०१३ ते २०१६ या कालावधीत कुशल बेरोजगार संस्थांना न देता ५ मजूर सहकारी संस्थांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-टेंडरिंग मध्ये जेवढी रक्कम या कामांसाठी मंजूर होती त्यापेक्षा अधिक रक्कम धनादेशाद्वारे देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्षात या रस्त्याचे काम केले नसताना कामाची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे. प्रश्नाधीन कामाच्या निविदाना दोन वेळेस प्रतिसाद मिळाला नाही. तृतीय निविदेस १४ निविदाकारांनी प्रतिसाद दिला. यामध्ये सर्वात कमी दर दिलेल्या निविदाकारास अनामत रक्कम भरण्याबाबत कळविले होते. तथापि, त्याने अनामत रक्कम भरली नाही. सबब, सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नाही. दरम्यानच्या कालावधीमध्ये कामाचे ६ भाग पाडून मजूर सहकारी संस्थांना काम देण्यात आले.

(२), (३) व (४) मजूर सहकारी संस्थांनी केलेल्या करारनाम्या पेक्षा जास्त रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

परंतु कामासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर कामासंदर्भात दक्षता व गुण नियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फलटण-लोणंद-शिरवळ (जि.सातारा) या राज्य मार्गाचे चौपदरीकरणाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(४) * ८६४६६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलटण-लोणंद-शिरवळ (जि.सातारा) या राज्यमार्ग क्रमांक ७० च्या चौपदरीकरणाचे सन २०१० मध्ये सुरु झालेले काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर अनेक खड्डे पडले असल्याने सन २०१० पासून आतापर्यंत २०० हून अधिक अपघात झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गाचे काम माहे ऑक्टोबर, २०१२ पासून पूर्णतः बंद असून बहुतांशी यंत्रसामग्री व मनुष्यबळ स्थलांतरित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रस्त्याच्या कंत्राटदारांनी चौपदरीकरणाचे काम अद्यापपर्यंत पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदर रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) सदर रस्ता एकूण ५६ कि.मी. लांबीचा असून, त्यापैकी ४३ कि.मी.लांबीचे चौपदरीकरण भागश: पूर्ण झाले आहे. उर्वरित १३ कि.मी. लांबीतील काम भूसंपादना अभावी अपूर्ण आहे.

सर्वसाधारणपणे अपघात हे रस्त्याच्या परिस्थितीकडे लक्ष न देता भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे होत आहेत.

भुसंपादनामुळे कामास विलंब झाला आहे. फलटण-लोणंद ही लांबी राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ म्हणून घोषीत झाली आहे. लोणंद-शिरवळ ही लांबी

राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: मंजूर आहे. सदर लांबी राष्ट्रीय महामार्ग विभागास हस्तांतरीत करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील गोपीनाथ मुंडे शेतकरी विमा योजनेच्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(५) * ८५०६४ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील ३५७ शेतकऱ्यांनी गोपीनाथ मुंडे शेतकरी विमा योजनेच्या लाभाकरीता कृषी विभागाकडे सादर केलेल्या प्रस्तावांपैकी ८६ लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीकरीता संबंधित विमा सल्लागार कंपनीने जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणाची यादी व मासिक प्रगती अहवाल कृषी आयुक्त, विभागीय कृषी सहसंचालक, संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे दरमहा पाठवावा असे स्पष्ट निदेश दिले असतानाही सदर अहवाल पाठविला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या प्रलंबित प्रस्तावामधील अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करण्याची जबाबदारी विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांची असतांनाही त्यांनी मागील ५ वर्षापासूनची ४३ प्रकरणे अद्यापपर्यंत प्रलंबित ठेवलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन या योजनेतील ८६ लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या विमा सल्लागार कंपनीवर व त्रृटींची पूर्तता न करणाऱ्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) नागपूर जिल्हयात २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षात शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत एकूण ३७५ विमा प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी २३५ प्रस्ताव संबंधित विमा कंपन्यांकडून मंजूर झालेले असून ८८ प्रस्ताव विहित अटी व शर्तीत बसत नसल्यामुळे नामंजूर करण्यात आलेले आहेत. ४५ प्रस्ताव विमा कंपनीकडे तर ७ प्रस्ताव कृषि विभागाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अपुऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्याची जबाबदारी विमा दावेदाराची आहे. विमा दावा तयार करुन तो विमा कंपनीकडे रितसर दाखल करणे, त्याबाबत पाठपुरावा करुन तो मंजूर करुन घेणे, ही जबाबदारी कृषि विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची आहे. मागील ५ वर्षातील ५२ दावे प्रलंबित आहेत. हे खरे आहे.

(४) प्रलंबित विमा प्रस्तावांबाबत कृषि आयुक्तालयाकडून वेळोवळी आढावा घेऊन विमा कंपन्यांकडे पाठपुरावा केला जातो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात सुत्र कृमी किडीच्या प्रादुर्भावाने डाळींब व पेरु पिकांचे झालेले नुकसान

**(६) * ८५५६३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील पेरु, डाळींब व विविध भाजीपाला पिकांवर सन २०१६-१७ मध्ये सुत्र कृमी या किडीचा (रुट नॉट निमॅटोड) मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी फळपीक लागवड धारकांनी केलेल्या तक्रारीनुसार शासनाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये प्रामुख्याने अहमदनगर जिल्ह्यातील राहाता, साकुरी, बाभळेश्वर, लोकगाव, कोळणेवाडी, शिंगणापूर, धरणगाव या ठिकाणी या किडीचा सर्वाधिक प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किडीमुळे झालेल्या नुकसानीचे आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत संबंधित शेतकरी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री, कृषी आयुक्त, पुणे व जिल्हा कृषी अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे वारंवार मागणी करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने अर्थसहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील राहाता, साकुरी, बाभळेश्वर, लोहगाव, काळपेवाडी, शिंगणापूर, धरणगाव या ठिकाणी सुत्र कृमी (रुट नॉट निमॅटोड) या कीडीचा १० ते २० टक्के प्रादूर्भाव आढळून आला आहे.

(३) व (४) महात्मा फुले कृषि विद्यापिठ राहूरी येथील वनस्पती विकृती शास्त्रज्ञ, उपविभागीय कृषि अधिकारी, कृषि आयुक्तालय, तालुका कृषि अधिकारी राहाता व इतर क्षेत्रिय अधिकारी यांनी राहता, लोहगाव, साकुरी या गावांना भेट देवून, शेतकऱ्यांना, पाणी व खत व्यवस्थापन, निरोगी कलम/रोपांची निवड, औषधांचा वापर, झेंडू या सापळा पिकाची लागवड, वेलवर्गीय आंतर पिक न घेणे, पिकांच्या बुंध्याभोवती आच्छादन करणे इत्यादीबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

राहूरी तालुक्यात प्रादूर्भावाची तीव्रता कमी आहे. शेतकऱ्यांना संदेश पाठविण्यात आला असून, प्रादूर्भावाचे प्रमाण वाढू नये म्हणून मार्गदर्शन करण्यात आले आहे. कोपरगाव तालुक्यात सुत्र कृमीचा प्रादूर्भाव होवू नये म्हणून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

राहता, कोपरगाव, राहूरी येथील शेतकऱ्यांना, आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जास्त उत्पादन घेणेबाबत, तसेच डाळींब, पेरू यांना जास्तीत जास्त बाजार भाव कसा मिळवता येईल याबाबत क्षेत्रिय अधिकारी व कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथिल शास्त्रज्ञ वेगवेगळया माध्यमातून मार्गदर्शन करीत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनींवर 'स्वामी शंकराचार्य मठ' यांनी बेकायदेशिररित्या अधिकार दाखविल्याबाबत

**(७) * ८७०५० श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील दुर्गम व डोंगराळ भागातील शेतकऱ्यांच्या अंदाजे २५ ते ३० हजार एकर जमिनींवर 'स्वामी शंकराचार्य मठ' यांनी बेकायदेशिररित्या अधिकार दाखविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमिनी शेतकऱ्यांना पुन्हा कसण्यास देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली असून जमिनी शेतकऱ्यांना परत मिळवून देण्याबाबत मा.महसूल राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन सदर जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) व (३) मौजे कोनोली तर्फ असंडोली ता.राधानगरी जि.कोल्हापूर येथील ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधींना यासंदर्भात दिलेल्या निवदेनाच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री (महसूल) यांना या विषयी बैठक आयोजित करण्याची विनंती केलेली होती. त्यानुषंगाने "स्वामी शंकराचार्य मठ, कोल्हापूर

यांनी कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या जमिनींवर बेकायदेशिररित्या अधिकार दाखविल्याबाबत" या विषयावर मा. राज्यमंत्री (महसूल) यांचेकडे दिनांक १८.०४.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सदरचा विषय व्यापक स्वरुपाचा असल्याने या विषयी मा. मंत्री (महसूल) यांचेकडे श्री. स्वामी शंकराचार्य मठ, कोल्हापूर यांचे प्रतिनिधीसह पुनश्च: बैठक आयोजित करण्याचे ठरले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात कृषी विभागाकडून तुरीचे निकृष्ट दर्जाचे बियाणे वाटप केल्याबाबत

**(८) * ९२१९७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी, भायगव्हाण, शिंदेवडगांव, दहाळगांव, श्रीपत धामणगांव, लिंबी, जिरडगांव (ता.घनसावंगी, जि.जालना) येथील शेतकऱ्यांना सन २०१६-१७ या वर्षात कृषी विभागाकडून २४७० जातीचे तूर या पिकाचे संकरीत बियाणे वाटप करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी सदर बियाण्यांची लागवड केली असून व्यवस्थित जोपासना करुन व वेळोवेळी खतपाणी देऊनसुध्दा पिकाला शेंगा न लागल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे बियाणे वाटप करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) नाही. तथापि, २,७४० शेतकऱ्यांना सुमारे ५९.८० क्विं बियाणे पुरवठा केला होता व त्याची ११९६ हे. क्षेत्रावर लागवड झाली होती. सदर तुरीला फुलांची धारणा होऊनही अल्प प्रमाणात शेंगा लागल्याबाबत ३५५ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यांचे सुमारे २१०.८० हे. क्षेत्र आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) सदर बाधीत क्षेत्राची उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने पाहणी केली आहे. त्यांनी सन २०१६-१७ मध्ये माहे सप्टेंबर-ऑक्टोंबर मध्ये अधिक पाऊस झाल्यामुळे जमिनीत ओलावा जास्त काळ राहिल्याने अनुकूलन अक्षमतेमुळे वरचेवर फुलांचा बहर येत गेला तथापि, त्याचे शेंगात रुपांतर झालेले नसल्याचे सकृत दर्शनी अनुमानित केलेले आहे. सबब, संबंधित बियाण्यांची GOT व DNA फिंगरप्रिंटीग तपासणी करण्यात येत असून त्यातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही केली जाईल त्याचप्रमाणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, जालना येथे तक्रार नोंदविलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कामठी (जि.नागपूर) तालुक्यात विनापरवाना विटभट्ट्या सुरू असल्याबाबत

**(९) * ८९३१९ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी (जि.नागपूर) तालुक्यात मोठ्या प्रमाणात विनापरवाना विटभट्ट्या सुरू असल्याने शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विटभट्ट्यांसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर केला जात असल्यामुळे सामान्य नागरिकांना पाण्याची टंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर बेकायदेशीर विटभट्ट्या बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यात ५८ विटभट्टया विनापरवाना चालू असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यामार्फत सदर विटभट्टयांची चौकशी करून त्या बंद करण्यात आल्या असून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) नुसार सदर विटभट्टयांवर कारवाई करण्याची कार्यवाही तहसिलदार कामठी यांच्यास्तरावर सुरू आहे.

सदर विटभट्टयामुळे सामान्य नागरीकांना पाण्याची टंचाई निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील शेतकरी पंतप्रधान पिक विमा योजनेच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(१०) * ९२२८३ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील एक लक्ष सत्तर हजार शेतकऱ्यांनी पंतप्रधान पिक विमा योजनेंतर्गत सन २०१६ मध्ये ६० लक्ष रुपये भरले असतानाही केवळ कपाशी व तूर या पिकांचा विमा सोडून इतर पिके घेतलेल्या केवळ २१० शेतकऱ्यांना पिक विम्याची भरपाई देण्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती पिक विम्यापासून वंचित असलेल्या उर्वरित शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) जळगाव जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत राबविण्यात आली. खरीप हंगाम २०१६ मध्ये सदर योजनेअंतर्गत जळगाव जिल्ह्यातील १.८६ लाख शेतकऱ्यांनी रु ४३.६२ कोटी विमा हप्ता भरुन २.४७ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षीत केले. योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनूसार ९,०५९ पात्र शेतकऱ्यांना रु ४.०५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत निश्चित करण्यात आली असून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी संबंधीत बँकांकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे हंगेवाडी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे जंगल पोखरुन वाळूची तस्करी होत असल्याबाबत

**(११) * ८७७८४ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हंगेवाडी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील जंगलातील झाडे तोडून व जंगल पोखरुन वाळूचा अवैध उपसा व तस्करी करण्यात येत असून याकडे संबंधित अधिकारी व कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त ठिकाणी वाळूची तस्करी करणाऱ्या वाळू माफियांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे हंगेवाडी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथे डिसेंबर, २०१६ मध्ये घोड नदी काठावरील जंगल पोखरुन वाळू उपसा केल्याबाबतची तक्रार वन विभागाच्या टोल फ्री कॉल सेंटरवर दुरध्वनीद्‌वारे

नोंदविण्यात आली असून वनपरिक्षेत्र अधिकारी, श्रीगोंदा (रोहयो) यांनी वाळू नेण्याच्या उद्देशाने माती उत्खनन प्रकरणात अज्ञात इसमा विरुद्ध वनगुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणात झाडांची तोड झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) होय, याप्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन), अहमदनगर यांनी चौकशी केलेली आहे.

(३) सदर वाळू तस्करी प्रकरणी माहे डिसेंबर, २०१६ नंतर एकूण तीन वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत. याशिवाय वाळू तस्करी रोखण्यासाठी सदर वनक्षेत्रात तात्पुरत्या स्वरुपात असलेले रस्ते उध्वस्त करण्यात आले आहे. तसेच नदीकाठी गस्ती वाढवून वाळू तस्करी रोखण्यासाठी दक्षता घेण्यात आलेली आहे.

तसेच चौकशी अहवालानुसार सदर प्रकरणात दुर्लक्ष केलेल्या वनअधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली आहे तसेच संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी व वनरक्षकाची बदली करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरेड (जि.नागपूर) तालुक्यातील भूमि अभिलेख कार्यालयातून आखिव पत्रिकेचा रेकॉर्ड गहाळ झाल्याबाबत

**(१२) * ९०५४८ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.नागपूर) तालुक्यातील उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालयातील आखिव पत्रिकेचा रेकॉर्ड अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे माहे मे, २००७ मध्ये गहाळ झाल्याची बाब निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयातील आखिव पत्रिकेचा रेकॉर्ड गहाळ झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना शासकीय कामानिमित्त लागणाऱ्या आखिव पत्रिका मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून या कार्यालयातील गैरजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व शेतकऱ्यांना आखिव पत्रिका तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) विविध काळात करण्यात आलेल्या कार्यालयीन निरीक्षणात उपअधीक्षक भूमि अभिलेख, उमरेड या कार्यालयातून एकूण ४२ आखीव पत्रिका गहाळ झाल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात उपअधीक्षक भूमि अभिलेख, उमरेड यांनी दि. १८ मे, २०१७ रोजी पोलीस स्टेशन, उमरेड येथे तक्रार दाखल केली आहे. गहाळ झालेल्या सदरहू ४२ आखीव पत्रिकांचे पुनर्गठन करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदरहू कार्यालयातील ४२ मुळ आखीव पत्रिका गहाळ झाल्या असल्या तरी सदर कार्यालयातील आखीव पत्रिकांच्या संगणकीकरणाचे काम पुर्ण झालेले असून तपासून कायम केलेल्या संगणकीकृत आखीव पत्रिका उपलब्ध आहेत व त्यामुळे नागरिकांना आखीव पत्रिकांच्या नकला मिळण्यास अडचण होत नाही.

-----------------

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत स्विडनच्या तंत्रज्ञानावर आधारित दुग्धजन्य पदार्थ तयार करणारा प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

**(१३) * ८९१३२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महानंद डेअरीकडे दही, ताक, लस्सी, मसाला दूध आदी दुग्धजन्य पदार्थांची मोठया प्रमाणात मागणी असल्याने डेअरी प्रशासनाने केंद्र सरकारच्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत २० कोटी रुपये खर्च करुन स्विडनच्या तंत्रज्ञानावर आधारित २० टन क्षमतेचा दही, ताक, लस्सी तयार करणारा सह उत्पादन प्रकल्प उभारला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्प अद्याप कार्यान्वित झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्प तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ म.(महानंद) यांना दूध व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती प्रकल्पाच्या आधुनिकीकरणासाठी रु.१६.०० कोटी रक्कमेचा प्रकल्प राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत मंजूर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पातील मशीनरी बसवण्याचे काम मार्च, २०१७ अखेरीस पुर्ण करण्यात आलेले असून, प्रकल्पाचे ऑटोमेशनचे काम पुर्ण करुन मशीनरी सुरु करणे, मशीनचे संपूर्ण क्लिनींग (CIP) करणे व ट्रायल रन घेणे ही कामे माहे एप्रिल, २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आली. सदर प्रकल्पातून पहिल्या टप्प्यात लस्सी व ताकाचे उत्पादन सुरु केले असून माहे मे, २०१७ मध्ये ४७.५ मे.टन ताक व १९ मे.टन लस्सीचे उत्पादन असे एकूण ६६.५ मे.टन उत्पादन घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वीज पडून जिवीतहानी होण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(१४) * ८९०१९ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये गेल्या काही वर्षापासून मान्सून कालावधीमध्ये वीज पडून मृत्यूमुखी पडणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ झाली असून विशेषत: नांदेड जिल्ह्यात मागील तीन वर्षात वीज पडून ५४ जणांचे मृत्यू झाले असल्याचे

माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज अटकाव यंत्रणा उभारणीचा प्रस्ताव निधी उपलब्ध नसल्याने आपत्ती व्यवस्थापन विभागात सन २०१५ पासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाला निधी उपलब्ध करुन वीज अटकाव यंत्रणा उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) गेल्या काही वर्षांपासून राज्यामध्ये मान्सून कालावधीमध्ये वीज पडून मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ झाली आहे. वीज पडून मृत्यु रोखण्यासाठी आणि त्यासंदर्भातील ठोस उपायोजना ठरविण्यासाठी शासन निर्णय दि.२.२.२००८ अन्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली होती.

दिनांक ०९.०५.२००८ च्या शासन निर्णयान्वये वीजप्रवण भागामध्ये प्रायोगिक तत्वावर वीज अटकाव यंत्रणा उभारण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यासाठी प्रत्येक जिल्हयात दोन वीज अटकाव यंत्रणा उभारण्यासाठी प्रत्येकी रू.१,००,०००/- (रूपये एक लाख फक्त) एवढा निधी सर्व जिल्हयांना उपलब्ध करण्यात आला आहे.

वीज पडून होणाऱ्या मृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत वीज पडत असतांना लोकांनी काय करावे आणि काय करू नये याबाबत जनजागृती करण्यात येते.

वीज अटकाव यंत्रणा वीज कोसळण्यास प्रतिबंध करू शकत नाही, तर ती कोसळणाऱ्या वीजेला वीज अटकाव यंत्रणेच्या माध्यमातच शोषून घेते. सद्य:स्थितीत नांदेड जिल्हयात मुखेड, तालुका मुखेड, मरखेड, तालुका देगलूर, येवली, तालुका हदगांव आणि बाचोटी, तालुका कंधार या ठिकाणी वीज अटकाव यंत्रणा कार्यरत आहे.

-----------------

## साक्री (जि.धुळे) तालुक्यात अतिवृष्टीमुळे पाझर तलाव फुटून झालेले नुकसान

**(१५) * ९०२४७ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील माळमाथा परिसरातील खुडाणे, डोमकानी, निजामपूर व जैताणे शिवारातील पाझर तलाव गतवर्षीच्या अतिवृष्टीमुळे फुटल्याने झालेल्या नुकसानाची भरपाई देऊन तलावाचे नव्याने बांधकाम करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी वन अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषंगाने ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याबाबत व सदर तलावाचे नव्याने बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यात माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतीपिके/फळपिके यांच्या झालेल्या नुकसानाबाबत बाधित शेतकऱ्यांना पिक नुकसानीवर आधारित दि.०९ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पाझर तलावाच्या दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, धुळे यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. तद्‌ननंतर खुडाणे गावातील ग्रामस्थांनी सदरच्या पाझर तलावाचे दुरुस्तीचे काम लोकसहभागातून पूर्ण केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भिमा नदीवरील पुलाला वाळू उपशामुळे धोका निर्माण झाल्याबाबत

**(१६) * ९१३२७ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भिमा नदीवरील ब्रिटीश कालीन अठ्ठावीस दगडी पुलालगत मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा केल्याने उक्त पुलास धोका निर्माण झाला असून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलास निर्माण झालेल्या धोक्याबाबत शासनाने केंद्र शासनाच्या रेल्वे विभागास अवगत केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर पुलालगतचा वाळू उपसा रोखण्याबाबत व पुलाचे संरक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील भिमा नदीवरील ब्रिटीशकालीन अठ्ठावीस दगडी पुलालगतच्या वाळूचा अवैध उपसा रोखण्याकरीता तहसिलदार दौंड यांच्यास्तरावर भरारी पथके गठित करण्यात आली असून, सदर पुलाच्या दोन्ही बाजूलगत कोणत्याही प्रकारचे वाळू उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कन्हान नदी (जि.नागपूर) पात्रातील अवैध वाळू उपसा

**(१७) * ९२९८६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर जिल्ह्यातील कन्हान नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा करून सदर वाळू अमरावती जिल्ह्यात तस्करी केली जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी २ ब्रास वाळू उपशाची रॉयल्टी असतांना अवैधरीत्या १२ ब्रास वाळू उपसा करून वाहतूक करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार अवैध वाळू उपसा करून तस्करी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नागपूर जिल्ह्यातील कन्हान नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा करुन, अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यात अवैधरित्या क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होत असल्याबाबतची ७ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. सदर प्रकरणांमध्ये तहसिलदार तिवसा यांनी कारवाई करून संबंधितांविरूद्ध रु. ९,४१,३५२/- एवढ्या दंडात्मक रकमेबाबत आदेश पारित केले असून, संबंधितांविरूध्द पालिस स्टेशन, तिवसा येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर दंडाची रक्कम संबंधितांनी शासनजमा केली नसल्याने सदर प्रकरणी जप्त केलेली वाहने पोलिस स्टेशन तिवसा येथे जमा केली आहेत.

नागपूर जिल्ह्यातील कन्हान नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा करुन अमरावती जिल्ह्यातील धामणगांव रेल्वे तालुक्यात वाहतूक होत असल्याबाबतची २ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यापैकी ०१ प्रकरणात तहसिलदार, धामणगांव रेल्वे यांनी संबंधितांविरुध्द रुपये २,४४,०००/- एवढ्या दंडात्मक रकमेबाबत आदेश पारीत केले आहेत. तसेच १ प्रकरणांत

पोलीस उपनिरिक्षक, पोलीस स्टेशन तळेगाव दशासर यांनी संबंधित ट्रक चालक व मालकांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.६ साठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(१८) * ९०४३३ श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या चौपदरीकरणासाठी शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या जमिनीचा उर्वरित मोबदला शेतकऱ्यांना गत दोन वर्षापासून मिळाला नसल्याचे माहे फ्रेबुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गाचे काम संथ गतीने सुरु असल्याने अनेक शेतकऱ्यांना शेती उत्पन्न घेण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला अदा करुन महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही, चौपदरीकरणासाठी शेतकऱ्यांची जेवढी जमीन संपादीत करण्यात आली आहे तेवढ्याच जमीनीवर काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती उत्पन्न घेण्यास अडचणी येण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) अद्याप पर्यंत महामार्ग प्राधिकरणाकडून रू. २१.५१ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून त्यापैकी आत्तापर्यंत रू. १५.५५ कोटी इतक्या निधीचे वाटप झाले असून उर्वरीत निधी रू. ५.९६ कोटी वाटपाचे काम सुरू आहे. काही शेतकऱ्यांचे आपसात वाद तसेच वारस हक्क सिध्द करू शकत

नसल्याने व काही प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना नोटीस बजावूनही सुनावणी करीता शेतकरी उपस्थित राहत नसल्यामुळे निधी वाटपास विलंब होत आहे. उर्वरित मोबदला त्वरीत अदा करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, अकोला यांच्या कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यासह सांगली व सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व गारपिटीमुळे झालेले नुकसान

**(१९) * ८७९५७ श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील लातूर, बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांसह सांगली व सोलापूर जिल्ह्यामध्ये वादळीवाऱ्यासह झालेल्या पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या शेतपिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे मार्च व एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मौजे थेरगाव, हर्षी व पाचोड (ता.पैठण, जि.औरंगाबाद) परिसरात दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टी व चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांच्या घरांसह डाळिंब व मोसंबी फळबागांचे, बियाणे, खते व इतर साहित्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मौजे येल्लोरी (ता.औसा, जि.लातूर) येथे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या फळबांगा व पिकांच्या झालेल्या नुकसानाची पाहणी मा.पालकमंत्री लातूर, मा.कृषी राज्यमंत्री यांनी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठवाड्यासह सांगली व सोलापूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

मौजे येल्लोरी (ता.औसा, जि.लातूर) येथे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये पाऊस झालेला नाही. तथापि, दि.१५ मार्च,२०१७ रोजी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतीपिके व फळपिकांचे नुकसान झालेले आहे.
(४) सदर कालावधीत ३३६ घरांच्या झालेल्या नुकसानीबाबत पंचनामे करण्यात येवून दि. १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आपद्ग्रस्तांना वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात माहे मार्च, २०१७ या कालावधीत झालेल्या शेतीपिके/फळपिकांच्या नुकसानीवर बाधित शेतकऱ्यांना दिनांक ६ मे, २०१७ रोजीच्या शासननिर्णयान्वये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच माहे फेब्रुवारी, एप्रिल, मे व जून, २०१७ मध्ये अवेळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीपिकांची नुकसान भरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रीय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात आली आहे.

सदर माहिती संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कंजुर्ले पठार (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे मोन्टोकार्लो या कंपनीने अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन केल्याबाबत

**(२०) * ८६५७२ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-पुणे महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम करणाऱ्या मोन्टोकार्लो या कंपनीने कंजुर्ले पठार येथील गट नं. ६३/०३ मधुन रुपये ११,००९५ ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याबद्दल सदर कंपनीवर लावलेला रुपये ८ कोटी, ८० लाखांचा दंड सदर कंपनीने वारंवार मागणी करुनही न भरल्याने सदर कंपनीची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करण्याचे आदेश तहसीलदार यांनी तलाठी व मंडल अधिकाऱ्यांना दिल्याची बाब दिनांक ०९ मे, २०१७ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसीलदारांच्या आदेशावरुन शिबलापुरचे मंडल अधिकारी यांनी कंपनीची मालमत्ता जप्त करुन कंपनी कार्यालयाला सील लावले असून घारगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करुन जप्त केलेले साहित्य जमा केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे महसूल विभागाच्या संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती असूनही महसूल विभागाच्या भरारी पथकाने बेकायदेशीर सुरु असलेले उत्खननाचे काम थांबविलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत तसेच गौण खनिज उत्खननाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) खेड-सिन्नर राष्ट्रीय महामार्ग क्र.५० या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मे. मोन्टोकार्लो या कंपनीमार्फत करण्यात येत असून, सदर कामासाठी लागणाऱ्या दगडाचे उत्खनन करण्यासाठी मौजे कंजुर्ले पठार, ता. संगमनेर, जि.अहमदनगर येथील गट नं.६३/०३ मधून परवाने देण्यात आले आहेत.

सदर गटाची दि.२८/१२/२०१६ रोजी मोजणी केली असता, एकूण मंजूर परवानगीपेक्षा ११०९५ ब्रास जादा दगडाचे अनधिकृत उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्याने उपविभागीय अधिकारी संगमनेर भाग, संगमनेर यांनी

दि.२८/४/२०१७ रोजी मे. मोन्टोकार्लो कंपनीविरूध्द रू.८,८०,९९,३००/- एवढ्या दंडात्मक रकमेबाबत आदेश पारित केले. सदर दंडात्मक रक्कम मे. मोन्टोकार्लो कंपनीने शासनजमा न केल्याने तहसिलदार संगमनेर यांनी दि.३/५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संगमनेर तालुक्यातील सर्व मंडळ अधिकाऱ्यांना कंपनीची स्थावर व जंगम मालमत्ता ताब्यात घेऊन सदर मालमत्ता सील करण्याबाबत सूचना दिल्या. त्यानुसार मंडळ अधिकारी शिबलापूर व धांदरफळ यांनी मे. मोन्टोकार्लो कंपनीचे कार्यालय सील करून सदर कंपनीची ६ वाहने जप्त केली आहेत. त्यापैकी ५ वाहने पोलिस ठाणे, घारगांव व १ वाहन उपविभागीय अधिकारी संगमनेर यांच्याकडे जमा केली आहेत. तथापि, सदर कंपनीविरूध्द पोलिस ठाणे, घारगांव येथे तक्रार दाखल केलेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय डाळिंब संशोधन (जि.सोलापूर) केंद्राने डाळिंबाची संकरित जात विकसित केल्याबाबत

**(२१) * ८५८४८ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डाळिंबाच्या पिकांवर पडणारे तेलकट डाग व मर सारख्या रोगापासून मुक्तता देणारी डाळिंबाची एन.आर.सी.पी.एच-०६ ही नवीन संकरित जात राष्ट्रीय डाळिंब संशोधन (जि.सोलापूर) केंद्राने विकसित केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विकसित डाळिंबाचा वाण शेतकऱ्यांना लागवडीसाठी केव्हापासून उपलब्ध करून देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या नवीन विकसित संकरित जातीचा प्रसार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) जानेवारी - फेब्रुवारी, २०१८ पासून सदरहू विकसित डाळिंबाचा वाण शेतकऱ्यांना लागवडीसाठी उपलब्ध होऊ शकेल.

(३) राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर, राज्यातील सर्व कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्रे तसेच कृषि विभागामार्फत प्रसार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांचे निकृष्ट दर्जाच्या भूईमुग बियाण्यांमुळे झालेले नुकसान

**(२२) * ९२५०४ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील अनेक ठिकाणच्या भूईमुगाला निकृष्ट दर्जाच्या भूईमुग बियाण्यांमुळे शेंगा न लागल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे जून, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयातील नुकसानाची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) निकृष्ट दर्जाच्या भुईमूग बियाण्यांमुळे भुईमूगाला शेंगा न लागल्याबाबतच्या हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांच्या तक्रारी माहे मार्च, एप्रिल व मे, २०१७ मध्ये प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे.

(२) सदर तक्रारींच्या अनुषंगाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) उप विभागीय कृषि अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील तालुका तक्रार निवारण समितीने तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीत पिक

व्यवस्थापनातील दोष ज्यामध्ये अतिप्रमाणात रासायनिक खताचा वापर व पाणी जास्त प्रमाणात देण्यात आल्यामुळे पिकाची कायीक वाढ जास्त झाल्याबाबत, तसेच, उन्हाळी हंगामामध्ये ४० अंश सेल्सियस पेक्षा जास्त तापमानामुळे शेंगा कमी लागल्या असल्याचा निष्कर्ष, समितीने काढलेला आहे, नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कापसी (ता.अकोट, जि.अकोला) येथील ई-क्लास जमिनीतून मातीचे अवैध उत्खनन केल्याबाबत

**(२३) * ९१८६२ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोपटखेड (ता.अकोट, जि.अकोला) धरण टप्पा क्र.२ च्या बांधकामाकरिता या धरणाच्या कंत्राटदारानी कापसी येथील ई-क्लास जमिनीतून मातीचे अवैध उत्खनन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तहसिलदार, अकोट यांनी उक्त कंत्राटदारांविरुध्द कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अकोला जिल्ह्यातील मौजे पोपटखेड येथील लघुपाटबंधारे विस्तारीत लघु प्रकल्पासाठी मौजे कापसी, ता. अकोट येथील गट नं.११५ या ई-क्लास जमिनीतून संबंधित कंत्राटदारांनी सुमारे १६६ ब्रास मातीचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तहसिलदार अकोट यांनी संबंधित कंत्राटदारांविरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) मधील तरतूदींनुसार कारवाई

करण्याबाबतचा प्रस्ताव दि.१५ मे, २०१७ रोजी उपविभागीय अधिकारी, अकोट यांच्याकडे सादर केला. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, अकोट यांनी दिलेल्या निर्देशानुसार तहसिलदार अकोट यांनी दि.२० मे, २०१७ रोजी संबंधित कंत्राटदारांविरूध्द रू.८,५६,५६०/- एवढ्या दंडात्मक रकमेबाबत आदेश पारित केले असून, सदर रक्कम सक्तीच्या उपाययोजनांनी वसूल करण्याची कार्यवाही तहसीलदार, अकोट यांनी सुरू केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद-जळगाव महामार्गावरील अजिंठा गावाजवळील वाघूर नदीवरील पूलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२४) * ८८८६२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-जळगाव महामार्गावरील अजिंठा गावाजवळील वाघूर नदीवरील पुलाची दुरवस्था झाली असल्याने पूल कोसळून मोठी जिवीतहानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) औरंगाबाद जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील अजिंठा गावाजवळील वाघुर नदीच्या उपनदीवरील ३७ मी. लांबीच्या पुलाचे कॉंक्रिटचे कठडे काही जागी

तुटलेले आहेत, तथापि सद्यस्थितीत पूल वाहतूकीसाठी सुस्थितीत असून पुलावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे. वाहतूक वर्दळीचा विचार करता पुलाची रुंदी मानकाप्रमाणे नसल्याने तसेच पुलाचे खांब दगडी बांधकामामध्ये असल्याने अस्तित्वातील पुलाच्या ठिकाणी नवीन पूल बांधण्याचे काम सिल्लोड ते फर्दापूर हया ३९ कि.मी. महामार्गाच्या सुधारणेच्या प्रकल्पामध्ये समाविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सागरी किनारपट्टीवर मृत व मृत:प्राय अवस्थेत येणाऱ्या दुर्मिळ जीवांवर संशोधन करण्याची यंत्रणा उपलब्ध नसल्याबाबत

**(२५) * ८५२२८ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुहुतारा रस्त्याजवळील व नरीमन पॉईंट किनाऱ्यावर, रत्नागिरीमधील दाबोली व गुहागरच्या किनाऱ्यावर, जैतापूर जवळील माडबन गावा नजीकच्या किनाऱ्यावर व वसईजवळील भूगांव किनाऱ्यावर दिनांक १९ जानेवारी, २०१६ ते २५ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत व्हेल, डॉलफिन, टायगर शार्क, दुर्मिळ शॉ-फिश, ऑलिव्ह रिडले कासव, सनफिश आदी दुर्मिळ सागरी जीव मृतावस्थेत सापडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सागरी किनारपट्टीवर मृत किंवा मृतःप्राय अवस्थेत येणाऱ्या या दुर्मिळ जीवांचे पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत संशोधन करण्याची यंत्रणा शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदर संशोधन यंत्रणा मत्स्यव्यवसाय विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) दि. १९ जानेवारी, २०१६ ते २५ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत मुंबईतील जुहुतारा, नरिमान पॉईन्ट तसेच रत्नागिरीमधील दापोली व जैतापूर या ठिकाणच्या सागरी किनाऱ्यावर व्हेल व ब्ल्यु व्हेल मासे मृत वा मृतप्राय अवस्थेत आढळून आले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पर्यावरण संरक्षण अधिनियम-१९८६ च्या कलम १२(१) (अ) अन्वये पर्यावरण प्रयोगशाळा स्थापना करण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. परंतु, महसूल व वन विभागाच्या दि. ०१.१२.२०१६ रोजीच्या अधिसुचनेन्वये वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ नुसार मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिनिस्त सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग यांना त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत्रात “प्राधिकृत अधिकारी” म्हणून कार्य करण्यास प्राधिकृत केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकपूर्णा (जि.बुलढाणा) प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या जमिनींचा मोबदला न मिळाल्याबाबत

**(२६) * ९१३९९ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील खडकपूर्णा प्रकल्पाकरीता शेतकऱ्यांकडून थेट खरेदीने संपादीत केलेल्या जमिनींचा मोबदला महसूल विभागाच्या दिनांक १२ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिळण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाल्याचे तपासणीअंती आढळून आलेले नाही.

(२) शासन निर्णय दिनांक १२.०५.२०१५ नुसार बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत १५१ भूधारकांकडून २०.४३ हे.आर जमीन खरेदी करावयाची असून आतापर्यंत १०५ भूधारकांकडून १४.१० हे.आर जमीन खरेदी केली आहे व त्यासाठी रू.४.९५ कोटी इतका मोबदला त्यांना अदा केलेला आहे. उर्वरीत ४६ भूधारकांकडून ६.३३ हे.आर जमीनीचे टप्या-टप्याने खरेदी करण्यात येत असून त्याप्रमाणे संबंधित भूधारकांस जमीनीचा मोबदला अदा करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वासिंद-पिवळी-कांबारे (ता.शहापूर, जि.ठाणे) या राज्यमार्गाच्या दुरुस्ती कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(२७) * ९१५८४ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वासिंद-पिवळी-कांबारे (ता.शहापूर, जि.ठाणे) या राज्यमार्गाच्या दुरुस्ती कामांमध्ये कंत्राटदाराने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगनमत करुन करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त राज्यमार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे रस्त्याची दुरवस्था होऊन नागरिक, शालेय विद्यार्थी व वाहनचालकांची गैरसोय होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर राज्यमार्गाच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदारावर तसेच त्यास मदत करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## धामणगांव बढे ते वाघजाळ फाटा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) या मार्गावरील पुलाची दुरूस्ती करण्याबाबत

**(२८) * ८७१५३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामणगांव बढे ते वाघजाळ फाटा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) या मार्गावरील पूल कालबाह्य झाल्यामुळे पुलाची दुरवस्था झाली असून पूल धोकादायक झाल्यामुळे वाहनचालक तसेच प्रवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पूलाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर पुलाची पुनर्बांधणी करण्याबबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) पुलाची तपासणी करण्यात आली आहे व पूल सुस्थितीत आहे असे प्रमाणपत्र तपासणी करणाऱ्या तज्ञांनी दिले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) या दुर्गम भागातील रस्ते कामांच्या निधीचा झालेला दुरुपयोग

**(२९) * १२५२५ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) या दुर्गम भागातील रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता प्रतिवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येऊन सुध्दा येथील रस्त्यांची सुधारणा झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील परतवाडा ते धारणी, भोकरबर्डी ते धारणी, धारणी ते सुसर्दा, सावलीखेडा ते धुलघाट रेल्वेय, टेब्रुसोंडा ते परसापुर, धारणी ते मोगर्दा, टिटंबा ते उतावली, चाकर्दा ते हलदा, चोराकुंड, हरिसाल आदी दुर्गम रस्ते हे धारणी तालुक्याला जोडण्याकरिता आतापर्यंत ५० कोटी रुपये मेळघाटाकरिता प्राप्त झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी रस्याची कामे निकृष्ट दर्जाची करुन निधीचा दुरुपयोग करत असून मुख्यालयातही उपस्थित राहत नसल्याचे आरोप मेळघाटातील नागरिकांकडून करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची करुन निधीचा दुरुपयोग करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व या दुर्गम भागातील रस्ते दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्नांकित रस्त्याच्या कामाच्या वेळोवेळी क्षेत्रीय तपासण्या तसेच कामात वापरण्यात आलेल्या सामग्रीचे दक्षता व गुणनियत्रण मंडळाकडून तपासण्या करण्यात आल्या असून कामात कोठेही निकृष्ट दर्जाचे साहीत्य वापरल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी मुख्यालयातही उपस्थित राहत नसल्याचे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (ता.आर्वी, जि.वर्धा) या शहराच्या बाहेरून वळण रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत

**(३०) * ९१४७१ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (ता.आर्वी, जि.वर्धा) या शहरातून गेलेल्या आमला ते पुलगाव या रस्त्यावर मोठया प्रमाणात जड वाहनांची वाहतूक होत असल्याने अनेक अपघात होऊन निपराध लोकांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी शहराच्या बाहेरून वळण रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिंनाक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) निवेदनाची प्रत प्राप्त नाही.

(३) व (४) आर्वी बाह्य वळण रस्त्याचे भुसंपादनाचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले आहे. भूसंपादन पूर्ण झाल्यावर बाह्यवळण रस्त्याचे प्रत्यक्षात बांधकाम हाती घेता येईल.

-----------------

## डोंगस्ते (ता.वाडा, जि.पालघर) येथील दगडखाण व स्टोन क्रशरमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबत

**(३१) * ८५९८९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगस्ते (ता.वाडा, जि.पालघर) येथील दगडखाण व स्टोन क्रशरमुळे परिसरात धुळीचे लोट पसरत असून या खाणीतील ब्लास्टिंगच्या आवाजामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सामाजिक संघटना व नागरिकांनी तहसीलदार, वाडा यांचेकडे दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी व त्यानंतर अनेक वेळा तक्रार करून कंपनीविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर कंपनीविरुद्ध कारवाई करून या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याची समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील मौजे डोंगस्ते येथील स्टोन क्रशरमुळे त्या परिसरातील जमीन मालकांना त्रास होत असल्याने, सदर स्टोन क्रशर बंद करण्याबाबतची दि.३०/०३/२०१७ रोजीची तक्रार उपविभागीय अधिकारी, वाडा यांना प्राप्त झाली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने तहसिलदार, वाडा यांनी चौकशी केली असता संबंधित क्रशर मालक आणि संबंधित जमिन मालक यांच्यातील तक्रारीचे त्यांचे स्तरावर निवारण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

मौजे डोंगस्ते येथील दगडखाण व स्टोन क्रशरमुळे परिसरात धुळीच्या लोटामुळे व खाणीतील ब्लास्टींगच्या आवाजामुळे परिसरातील नागरिकाच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा परिषदेमध्ये विशेष घटक योजनेत झालेला गैरव्यवहार

**(३२) * ९२०८४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या कृषी समितीच्या दिनांक २३ जून, २०१७ रोजी झालेल्या सभेत कृषी विभागाच्या विशेष घटक योजनेत ३ कोटी, ७५ लक्ष रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले असून या सभेमध्ये जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष घटक योजनेतील साहित्याचे वाटप अवैधपणे करण्याचा व एकाच कुटुंबांतील अनेक सदस्यांना योजनेचा लाभ देण्याचा गैरप्रकार अधिकाऱ्यांनी केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१), (२), (३) व (४) जिल्हा परिषदेच्या कृषी समितीच्या सभेमध्ये गैरव्यवहाराबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. तथापि, मा.सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती, जिल्हा परिषद, अकोला यांनी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना दिनांक २७.६.२०१७ रोजी पत्र देवून, विशेष घटक योजनेमध्ये अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याची तक्रार केली आहे व सर्व पंचायत समितीनिहाय आढावा घेवून संबंधित दोषी अधिकारी कर्मचारी यांच्यावर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

सदर पत्रास अनुसरुन, प्रस्तुत प्रकरणी अकोला जिल्हा परिषद कार्यालयातील जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) यांनी अकोट तालुक्यातील सन २०१५-१६ मध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची रॅंडम पध्दतीने निवड करुन ७ गावातील १८ लाभार्थ्यांची तपासणी केली. सदर तपासणीमध्ये लाभार्थ्यांकडे वाटप केलेल्या बाबी असल्याचे दिसून आले. तसेच एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांना योजनेचा लाभ दिल्याचे दिसून आले नाही. उर्वरित पंचायत समित्यांमध्ये तपासणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदुरा व मलकापूर (जि.बुलडाणा) तालुक्यातील पुलांचे बांधकाम करण्याबाबत

**(३३) * ८८४२० श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलडाणा) तालुक्यातील वडनेर - मेंढळी - शेंबा रा. मा. २६६ या रस्त्यावरील कोकलवाडी गावाजवळ पूल नसल्यामुळे व राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ ते खुमगाव (ता.नांदुरा, जि.बुलडाणा) या रस्त्यावर केदार नदीवर दहिवडी गावाजवळ पुल नसल्यामुळे परिसरातील ग्रामस्थ व वाहन धारकांना दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) तसेच, मलकापूर (जि.बुलडाणा) तालुक्यातील हरसोडा - काळेगाव रस्त्यावर व घुसर - भाड्गणी - पिंपळखुटा रस्त्यावर विश्वगंगा नदीवर पूल नसल्यामुळे तसेच कोलासर ते शेलगाव मुकुंद रस्त्यावरील नाल्यावर स्लॅब ड्रेनेज अभावी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्यामुळे परिसरातील ग्रामस्थ व वाहन धारकांची गैरसोय होत असल्याचेही माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त चारही ठिकाणच्या पुलाच्या व कोलासर ते शेलगाव मुकुंद रस्त्यावरील नाल्यावर स्लॅब ड्रेनेजच्या बांधकामासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव यांच्याकडे वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन उपरोक्त चारही रस्त्यावर पूल तसेच कोलासर ते शेलगाव मुकुंद रस्त्यावरील नाल्यावर स्लॅब ड्रेनेज बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

कोकलवाडी गावाजवळ राज्यमार्ग क्र.२७७ वर रपटा अस्तित्वात आहे. तसेच हरसोडा काळेगाव रस्त्यावर (इजिमा-२६) तसेच घुसर भाडगणी पिंपळखुटा (इजिमा-३५) याठिकाणी मोरीचे बांधकाम अस्तित्वात आहे. याठिकाणी पावसाळ्यात दळणवळणाची गैरसोय होते.

(३) प्रश्नामध्ये नमूद कोकलवाडी गावाजवळील पूल (रामा-२७७), हरसोडा ते काळेगाव इजिमा २६ रस्त्यावर विश्वगंगा नदीवर पूल, घुसर भाडगणी पिंपळखुटा इजिमा-३५ रस्त्यावर विश्वगंगा नदीवर पूल या तीन ठिकाणी पूलाच्या बांधकामाची मागणी लोकप्रतिनिधीच्या पत्रामध्ये आहे.

(४) व (५) प्रस्तूत प्रकरणी हरसोडा ते काळेगाव इजिमा-२६ वर विश्वगंगा नदीवर, घुसर भाडगणी पिंपळखुटा इजिमा-३५ विश्वगंगा नदीवर, राष्ट्रीय महामार्ग क्र.६ दहिवडी केदार खुमगाव इजिमा ४२ येथे पूलाचे बांधकाम करणे तसेच कोलासर ते शेलगाव मुंकुद इजिमा-४२ वर स्लॅब ड्रेनचे बांधकाम करणे ही प्रश्नांकित कामे जिल्हास्तरीय रस्त्यावरील असून सदरचा रस्ता देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे अखत्यारित आहे. प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत हाती घेण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, बुलढाणा यांचेमार्फत सुरु आहे.

कोकलवाडी गावाजवळील रामा-२७७ वरील पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## बावनथडी (जि.नागपूर) प्रकल्पातील विस्थापित गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३४) * ९२०१५ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यप्रदेश व महाराष्ट्र शासनाने संयुक्तपणे नागपूर जिल्हयातील बावनथडी प्रकल्पाच्या कामाला १९८४-८५ मध्ये सुरुवात केली असून १९८१ पासून १९८३ पर्यंत प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या पुसदा, पिंडकापार, मुरझोड, चिकनापूर या गावांतील घरे व जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली मात्र २५ वर्षानंतरही या गावांचे पुनर्वसन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बावनथडी प्रकल्पाच्या ४४७ विस्थापित शेतकऱ्यांना २५ वर्षे झालेली असतानाही त्यांच्या शेतजमिनींचा मोबदला अद्यापही मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार बावनथडी प्रकल्पाच्या विस्थापितांचे पुनर्वसन करून त्यांना तातडीने मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सद्यस्थितीत बावनथडी प्रकल्पांतर्गत नागपूर जिल्हयातील रामटेक तालुक्यातील मौजा पुसदा, चिकनापूर, पिंडकेपार, मुरझड व सितेपार टोला या बाधित गांवाचे पुनर्वसन मौजा चिचदा, रमजान घोटी, टांगला व पिंडकेपार येथे करण्यात आलेले आहे. बाधित गावातील अनुक्रमे २३९,३०,१५२,२३ व ३ अश्या एकूण ४४७ बाधित कुटुंबापैकी ४४४ बाधित कुटुंबाचे पर्यायी गावठाणात स्थलांतरीत करण्यात आलेले आहे आणि इतर ३ कुटुंबाचे इतरत्र स्थलांतरीत झालेले आहेत. पर्यायी गावठाणात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सर्व प्रकारच्या नागरी सुविधा त्यांना पुरविण्यात आलेल्या आहेत.

पॅकेज १ अंतर्गत रोजगार प्रशिक्षणाकरिता, घरकुल बांधकामाकरिता, व्यापार संकुल बांधकामाकरिता, विभक्त कुटुंबियाच्या वारसदारांनी स्वतंत्र नव्याने बांधलेल्या घरांचा मोबदला इ.बाबींसाठी रु.४०७.६४ लक्ष कार्यकारी अभियंता, मध्यमप्रकल्प विभाग, गोंदिया यांनी वाटप केलेला आहे. कार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया यांचेकडून पॅकेज २ चा पुनर्वसन अनुदान उपविभागीय अधिकारी, मौदा यांना रु.६२१ लक्ष प्राप्त झाले असून त्यापैकी रु.५,९३,९४,२५६/ मोबदला वाटप करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील दगडखाणी बंद केल्याबाबत

**(३५) * ८६४९४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दगडखाणीवर हरित लवादाने बंदी आणली असून कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता सदर दगडखाणी बंद केल्यामुळे मुंबई शहराला होणारा खडीचा पुरवठा बंद झाला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयातील दगडखाणींचा कंत्राट कालावधी संपल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी १०४ खाणी बंद केल्याने हजारो खाण कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून बांधकाम व्यवसायावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खडी अभावी मुंबई शहर व उपनगरातील ५३८ रस्त्यांची कामे बंद पडली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन मुंबई शहर व उपनगरातील रस्त्यांची कामे तातडीने होण्यासाठी खडीचा पुरवठा करण्याबाबत व सदर दगडखानींचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दगडखाणीवर बंदी आणल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, ठाणे जिल्ह्यातील ७८ दगडखाणींची मुदत संपल्यामुळे व वन विभागाच्या जमिनीवरील २५ दगडखाणींना केंद्र शासनाकडून पर्यावरण अनुमती न मिळाल्यामुळे बंद आहेत. त्यामुळे मुंबई शहरात होणारा खडीचा पुरवठा एप्रिल व मे, २०१७ मध्ये विस्कळीत झाला होता. मुंबईमध्ये सुरू असलेल्या एकूण ८१५ रस्त्यांच्या कामांपैकी ३८९ रस्त्यांची कामे जुन २०१७ अखेरपर्यंत पूर्ण झाली आहेत. उर्वरीत रस्त्यांच्या कामाच्या निवेदेनुसार रस्त्याची कामे करण्याचा कालावधी अद्याप संपलेला नसून, पावसाळ्याच्या कालावधीत सदर कामे स्थगित करण्यात आली आहेत. पावसाळ्यानंतर सदर रस्त्यांची कामे सुरू करण्यात येईल.

ठाणे जिल्ह्यात सद्यस्थितीत ५८ दगडखाणी सुरू आहेत. त्यामुळे खाणपट्टे बंद असल्यामुळे खाण कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून बांधकाम व्यवसायावर त्याचा परिणाम झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## कृष्णा (जि.कोल्हापूर) नदी काठावरील मातीचे उत्खनन रोखण्याबाबत

**(३६) * ८८७६८ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृष्णा (जि.कोल्हापूर) नदी काठावरील माती सुपिक असल्यामुळे वीटभट्टी कामाकरिता या मातीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या उत्खननामुळे कृष्णा नदी काठावरील गावांना पुराचा धोका निर्माण झाला असून तेथील मळीघाट नामशेष होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर ठिकाच्या मातीचे उत्खनन रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर जिल्ह्यातील मौजे उदगांव येथील कृष्णा काठची माती अवैधरित्या उत्खनन करून वीटभट्टीसाठी वापरत असल्याबाबतची तक्रार दि.१८/०४/२०१७ रोजी काही स्थानिक रहिवाशांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे दिली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी जयसिंगपूर व गाव कामगार तलाठी, उदगाव व चिंचवाड यांच्यामार्फत चौकशी केली असता, मौजे उदगांव व चिंचवाड येथे मंजूरीपेक्षा ३३,४८७ ब्रास जादा मातीचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. सदर प्रकरणी तहसिलदार शिरोळ यांनी संबंधित जमीन मालकांविरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) नुसार दंडात्मक नोटीसा बजावल्या आहेत. त्यानुसार संबंधितांचा खुलासा प्राप्त होताच तहसीलदार यांचेकडून नियमानुसार कारवाई करण्याची तजवीज ठेवलेली आहे.

मातीच्या उत्खननामुळे कृष्णा नदीपात्राच्या परिसरातील गावांना पुराचा धोका निर्माण झाला असून तेथील मळीघाट नामशेष होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेरळ-कशेळे (जि.रायगड) या राज्य मार्गाची दुरुस्ती करून उरण-भीमाशंकर या मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३७) * ८८१७६ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील नेरळ-कशेळे या राज्यामार्गावरील भीमाशंकर येथील रस्ता जेसीबी लावून उखडल्याने रस्त्यावर तीन महिन्यापासून वारंवार अपघात होत असून त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, रायगड यांच्याकडे तक्रारी केल्या असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई वरून तीर्थक्षेत्र भीमाशंकरला जाण्यासाठीच्या रस्त्याच्या लांबी पेक्षा १०० कि.मी. कमी लांबी असणारा उरण-भीमाशंकर हा १७० कि.मी. चा राष्ट्रीय महामार्ग ५४ प्रस्तावित करण्यात आला असून या रस्त्याच्या कामाला सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात मंजूरी मिळाली असतानाही रस्ता अद्याप पूर्ण झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नेरळ-कशेळे या राज्यमार्गाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच उरण-भीमाशंकर या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४ चे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्नांकीत रस्ता हा उरण-पनवेल-भिमाशंकर रस्ता रा.मा.१०३ चा भाग आहे. या रस्त्याची कर्जत तालुक्यातील लांबी २०.०८१ कि.मी. आहे.

या लांबीपैकी ०/७०० ते १/५०० व २/२०० ते ४/५०० या ३.१०० किमी. लांबीतील रस्त्याची सुधारणा करण्याचे काम प्रगतीत आहे. सदर काम करताना रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाचे पिकींग करण्यात आले होते. सद्यस्थितीत रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या भागातील रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे. रस्त्याच्या कोठींबे ते रायगड जिल्हा हद्द या कि.मी. ८४/९३० ते ९०/३८१ या ५.४५१ कि.मी. लांबीत रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामास सन २००५ मध्ये

मंजुरी देण्यात आली होती. या लांबीपैकी १ कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ४.४५१ कि.मी. लांबीतील रस्त्याच्या बांधकामासाठी वनजमिनीचे संपादन करणे आवश्यक आहे. वन जमिनीचे भूसंपादनासाठी NGT राष्ट्रीय हरित लवादाची मान्यता मिळविण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. भूसंपादन झाल्यावर रस्त्याचे काम हाती घेवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील रेतीबंदर परिसरातील अवैध रेती उत्खनन

**(३८) * ८७४५८ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील रेतीबंदर परिसरात दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास महसूल विभागामार्फत घातलेल्या संयुक्त धाडीमध्ये सुमारे ७२ कोटी पेक्षा जास्त किंमतीची अवैध रेती उत्खनन यंत्रे, ट्रक व अवैधरित्या साठविलेला रेतीसाठा इत्यादी माल जप्त केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण रेतीबंदराचे मुंब्रा पारशी रेतीबंदराप्रमाणे उत्तमरित्या सुशोभिकरण करुन चौपाटी तयार करण्याचा प्रस्तावही जिल्हाधिकाऱ्यांच्या विचाराधीन असून त्याबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणचे अवैध उत्खनन रोखून अवैध उत्खनन करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच कल्याण रेतीबंदराचे सुशोभिकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील रेतीबंदर परिसरात जिल्हाधिकारी ठाणे, अपर जिल्हाधिकारी ठाणे, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, पोलिस उपायुक्त, कल्याण परिमंडळ-३ तसेच उपविभागीय अधिकारी कल्याण, तहसिलदार कल्याण व इतर अधिनस्थ अधिकारी यांनी दि.५/०४/२०१७ रोजी आकस्मिकपणे भेट देऊन पाहणी केली असता, यांत्रिक साधनांच्या सहाय्याने रेतीचे अवैध उत्खनन व साठा केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार सदर प्रकरणी दि.०५/०४/२०१७ ते दि.०९/०४/२०१७ या कालावधीत कारवाई करून १४ सक्शन पंप, १४ बार्जेस, ३४ क्रेनवर नियमानुसार कारवाई करून २२ हौद समतल करण्यात आले आहेत. तसेच रेतीचे ३५ साठे सपाट करण्यात आले आहेत. तसेच सदरच्या कारवाईमध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यामार्फत दि.६/०४/२०१७ रोजी एकूण ४३ व्यक्तींवर पोलीस स्टेशन बाजारपेठ येथे १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कल्याण रेतीबंदराचे मुंब्रा पारशी रेतीबंदराप्रमाणे सुशोभिकरण करून चौपाटी तयार करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी ठाणे यांच्या कार्यालयात विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) या पुनर्वसित गावाचे पावसाने झालेले नुकसान

**(३९) * ९१४२४ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) ह्या दिनांक ३० जुलै, २०१४ रोजी डोंगर कोसळून जमिनदोस्त झालेल्या गावाचे सर्व सुविधांनी कायमस्वरुपी पुनर्वसन करुन त्याचे लोकार्पण मा.मुख्यमंत्री यांचे हस्ते माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जून, २०१७ मध्ये झालेल्या पहिल्याच पावसात या पुनर्वसीत गावात टाकलेल्या भरावाची माती खचल्याने रस्ते व ड्रेनेज खचून घरांच्या भिंतींना तडे गेले असून अंगणवाडी जवळील मोठी भिंत पडल्याने गावातील शाळेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन माळीण गावाचे योग्य प्रकारे पुनर्वसन करण्याबाबत व या गावाचे निकृष्टप्रकारे पुनर्वसन करणारे कंत्राटदार, अधिकारी, संबंधित अभियंते व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

पावसामुळे भराव खचल्याचे अंशत: खरे आहे. तथापि कोणत्याही घरांना तडे गेलेले नाहीत अथवा कोणत्याही बांधकामास Structural नुकसान झालेले नाही.

(३) सदर नुकत्याच झालेल्यास कामास निविदा शर्तीनुसार दोषदायित्व निवारण कालावधीची अट लागू आहे. त्यानुसार ठेकेदाराच्या खर्चाने ठेकेदाराकडून अंशत: खचलेल्या ठिकाणी भराव पूर्ववत करण्याचे काम हाती घेतले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांचे रिलायन्स कंपनीकडून झालेले नुकसान

**(४०) * ९१९३६ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राजुरी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) व आजूबाजूच्या परिसरात रिलायन्स कंपनीकडून पाईपलाईनच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर खोदकाम करण्यात आले असून खोदकाम करताना केलेल्या ब्लास्टींगमुळे शेतकऱ्यांच्या बोअरवेलमध्ये माती जाऊन अनेक बोअरवेल बंद पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोअरवेल बंद पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पाणी बंद होऊन शेतातील पिके व फळबागा यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांना निवेदन देऊन सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदर ठिकाणी अवैध ब्लास्टिंग करणाऱ्या रिलायंस कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) "परांडा-भूम-वाशी मतदार संघामध्ये रिलायन्स कंपनीकडून शेतकऱ्यांचे नुकसान झाले असण्याबाबत" या विषयाबाबतचे लोकप्रतिनिधी यांचे दि.२७/०६/२०१७ रोजीचे पत्र मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (महसूल) यांना प्राप्त झाले आहे.

सन २००७-२००८ साली रिलायन्स कंपनीद्वारे उस्मानाबाद जिल्हयातील परांडा तालुक्यातील मौजे राजुरी व आजूबाजूच्या परिसरातील जमीन पेट्रोलियम अॅण्ड मिनरल्स पाईपलाईन्स (अॅक्वीझीशन ऑफ राईट ऑफ युजर इनलॅन्ड) अॅक्ट, १९६२ मधील तरतूदीन्वये तात्पुरत्या स्वरूपात संपादित करून, सदर ठिकाणी नैसर्गिक वायुवाहिनी टाकण्याचे काम करण्यात आले आहे. सदर कामादरम्यान करण्यात आलेल्या ब्लास्टींगमुळे वायुवाहिनीच्या क्षेत्रातील जमीन हादरून बोअरवेलमध्ये माती जाऊन बोअरवेल बंद पडल्याने बोअरवेलचे पाणी बंद होऊन शेतातील पिके व फळबागा यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार झालेल्या नुकसानीचे मुल्यांकन करून संबंधितांना रिलायन्स कंपनीमार्फत नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बावधन (ता.हवेली, जि.पुणे) येथील स्टारगेज या बांधकाम व्यावसायिकाने विनापरवाना गौण खनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(४१) * ९०३८५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावधन (ता.हवेली, जि.पुणे) येथील स्टारगेज या बांधकाम व्यावसायिकाने विनापरवाना गौण खनिजांचे उत्खनन करून बांधकामे केल्याचे तसेच अवैध वृक्षतोड केल्याचे व याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बावधन (ता.हवेली, जि.पुणे) येथील गंगा लेजंड या बांधकाम प्रकल्प विकासकाने बांधकामे करतांना सन २०१० ते २०१७ या कालावधीमध्ये गौण खनिजांचे उत्खनन करून शासनाच्या महसुलाचे नुकसान केले असून सदर उत्खननासाठी त्यांनी परवानगी घेतली नसल्याचे व बांधकामाचा राडारोडा लगतच्या राम नदी मध्ये टाकून पर्यावरणाची हानी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार स्टारगेज व गंगा लेजंड या बांधकाम व्यावसायिकावर तसेच त्यांनी केलेल्या अवैध उत्खननाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मौजे बावधन येथे “गंगा लेजंड” या बांधकाम प्रकल्प विकासकाने उक्त ठिकाणी बांधकामासाठी खोदकाम करताना गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आलेले आहे. तथापि, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१५ नियम ४६ मधील सुधारणेनुसार ज्यावेळी एखाद्या भूखंडाचा विकास करताना मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या

सपाटीकरणाकरीता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकास प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामित्वधन भरले जाणार नाही.

मात्र, सदर विकासकाने बांधकामाचा राडारोडा लगतच्या रामनदी पात्रात टाकल्यासंदर्भात मा. राष्ट्रीय हरित लवाद, खंडपीठ पुणे येथे याचिका दाखल करण्यात आली असून, सदर याचिका प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोडोली-काखे-मोहरे, अमृतनगर-निलेवाडी-ऐतवडे व अमृतनगर-चिकुर्डे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४२) * ८५५५६ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली-काखे-मोहरे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) हा रस्ता कोल्हापूर व सांगली या दोन जिल्ह्यांना जोडणारा प्रमुख रस्ता असून या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडल्याने रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने पूर्णपणे निरुपयोगी झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमृतनगर-निलेवाडी-ऐतवडे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या हातकणंगले, पन्हाळा व वाळवा या तीन तालुक्यांना जोडणाऱ्या रस्त्याची व अमृतनगर-चिकुर्डे या रस्त्याची दुरवस्था झाली असून सदरहू रस्ते वाहतुकीस धोकादायक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तिन्ही रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीच्या अनुषंगाने कोडोली-काखे-मोहरे, अमृतनगर-निलेवाडी-ऐतवडे व अमृतनगर-चिकुर्डे या तिन्ही रस्त्यांची दुरुस्ती करून रस्ते वाहतुकीसाठी सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नांकित रस्ता हा डोणोली चरण सैदापूर सावर्डे सातवे मोहेरे काखवे ते कोडोली प्रजिमा ६ चा भाग आहे. तसेच जिल्हा परिषद, कोल्हापूर या अखत्यारितील रा.मा.१९२ ते काखे यांच्या ग्रा.मा.४ दर्जाच्या रस्त्याची काही लांबी प्रश्नांकित रस्त्यात समाविष्ठ आहे. या रस्त्याचा काही भाग क्षतिग्रस्त झाला होता. या क्षतिग्रस्त भागातील रस्त्याची दुरुस्ती व डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित रस्ते हातकणंगले तालुकयातील इजिमा - २६ ते निल्लेवाडी तालुका हद्द रस्ता ग्रा.मा.८९ व अमृतनगर ते चिकुर्डे इ.जि.मा.१९५ चे भाग आहेत. या रस्त्यांपैकी इ.जि.मा.१९५ या रस्त्यावर अपघात झाल्याची नोंद पोलिस दप्तरी आहे. या रस्त्याच्या लांबीपैकी काही लांबीत रस्ते क्षतिग्रस्त झाले आहेत.

(३) रस्त्याची पाहणी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी केली आहे.

(४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील व जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अखत्यारितील रस्त्यांची आवश्यक दुरुस्ती करुन रस्ते वाहतुकीस सुरळीत ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

या रस्त्यांच्या क्षतिग्रस्त भागातील काही दुरुस्तीची कामे मंजूर असून हाती घेण्यात येत आहेत. काही दुरुस्ती / सुधारणांची कामे सा.बां.वि. व जि.प. कोल्हापूर यांच्यामार्फत मंजूरी, निधि निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई, पालघर व डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यांवर धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत

**(४३) * ९२४५७ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, पालघर व डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यांवर धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री व प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ व दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हयातील सातपाटी, नवापूर, तारापूर, धिवलीसह अन्य गावांलगतच्या किनारपट्टीवर उभारण्यात येणारे धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबतची मंजूरी महाराष्ट्र किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने (सीआरझेड) नाकारली असल्याने किनाऱ्यावरील मच्छिमारांच्या जीवीतास धोका निर्माण झाला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डहाणू किनारपट्टीवरील दिवा-दांडीचा संरक्षक धूप प्रतिबंधक बंधारा खचल्यामुळे किनारपट्टीवरील गावांची सुरक्षा धोक्यात आली असून वसई तालुक्यातील किनारपट्टीवरील गावांमध्ये माहे जून, २०१७ च्या अखेरच्या सप्ताहामध्ये उधाणाच्या भरतीचे पाणी सुरुच्या बागांमध्ये व भातशेतीमध्ये १५० ते २०० फूट आंत शिरल्यामुळे रानगाव व भुईगावच्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून मच्छीमारांची घरे देखील उध्वस्त झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून पालघर जिल्हयातील विविध ठिकाणच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांना किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाची मंजुरी मिळवून सदर ठिकाणी तातडीने धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय. अंशतः खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सातपाटी, नवापूर, तारापूर व एडवण (ता.जि.पालघर) येथे बांधावयाच्या समुद्र धूपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामाचा सदर प्रस्ताव महाराष्ट्र किनारा व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांच्या दि.२८.६.२०१७ रोजीच्या बैठकीत

फेरसादर करण्यात आला असता प्राधिकरणाने मंजूरीबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून बैठकीचे इतिवृत्त महाराष्ट्र किनारा व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडून अद्याप अप्राप्त आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील साळाव पुलाखालील अवैध उत्खननाबाबत

**(४४) * ९२५०१ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील तीस वर्ष जुन्या साळाव पुलाला छोटा खडडा पडला असून उक्त पुलाखाली होणाऱ्या रेती उत्खननामुळे पुलाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर पुलावरील खड्डा बुजवून पुलाखाली होणारे अवैध रेती उत्खनन बंद करण्याबाबत व उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाही.

तथापि पूलाच्या दोन गाळयामध्ये असलेल्या स्लॅबमधील प्रसरण सांधा क्षतिग्रस्त झाला होता. तो आता दुरुस्त करण्यात आला आहे. पूलाचे सविस्तर सर्वेक्षण व सर्वसमावेशक तपासणी करण्याचे काम निविदास्तरावर आहे.

(३) व (४) पूलाच्या प्रसरण सांध्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. पूलाचे सविस्तर सर्वेक्षण व सर्वसमावेशक तपासणी करुन प्राप्त होणाऱ्या अहवालातील निष्कर्षानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

पूलाच्या लगत रेती उत्खनन झाले नसल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रमाणित केले आहे. तसेच रेती उत्खनन होऊ नये यासाठी महसूल व पोलिस यंत्रणेस सतर्क राहण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिल्या आहेत. पूल वाहतुकीस सुरक्षित आहे.

-----------------

## तळवडे-खेरवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील पूल अत्यंत जीर्ण झाल्याबाबत

**(४५) * ८६४०६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळवडे (जि.सिंधुदुर्ग) येथून बाजारपेठमार्गे नेमळे-कुडाळ या मार्गावर तळवडे-खेरवाडी या ठिकाणी असणारा पूल अत्यंत जीर्ण होऊन वाहतुकीस धोकादायक झाल्याने कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलासाठी खासदार निधीतून १ कोटी, ६० लाख रुपयांचा निधी मंजूर असून पुलाचे भूमीपुजन झाले असतांनाही अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे उक्त पुलाच्या बांधकामास अद्यापी सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन सदर पुलाच्या बांधकामास तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्यावर कि.मी. ५/१०० येथे पूर रेषेखालील (submersible) पाईप कॉजवे आहे. कॉजवेच्या धावपट्टीचा काही भाग क्षतिग्रस्त झाला होता तो आता दुरुस्त करण्यात आला आहे. या कॉजवेवरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) व (३) प्रश्नांकित कॉजवे पूर रेषेखालील आहे. त्यामुळे या ठिकाणी उच्च पातळीचा (Non submersible) पूल बांधण्याचे काम मंजूर असून काम सुरु करण्याचे आदेश मे २०१७ मध्ये कंत्राटदारांना देण्यात आले आहेत. स्वीकृत निविदेतील तरतूदी प्रमाणे व निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुळा व कुकडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) नदी पात्रातील अवैध वाळू उपसा

**(४६) * ८६५८० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुळा व कुकडी नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याचे दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नागापूरवाडी (पळशी) येथील मुळा नदीपात्रातील वाळूचा लिलाव झालेला नसतानाही त्याठिकाणी अवैध वाळू उपसा चालू असल्यामुळे शासनाचे करोडो रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस पडली आहेत. अहमदनगर जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर भरारी पथकांमार्फत माहे मे, २०१७ मध्ये पारनेर तालुक्यातील मौजे पळशी येथील वाळूच्या अनधिकृत वाहतूकीच्या एका प्रकरणात कारवाई करून रू.७५,२५४/- एवढा दंड वसूल करून शासनजमा

केला आहे. तसेच या व्यतिरीक्त माहे मे, २०१७ मध्ये पारनेर तालुक्यातील वाळूच्या अवैध वाहतूकीच्या ८ प्रकरणांमध्ये कारवाई करून रू.५,४४,८८६/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पुलांची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(४७)** * **८८२०८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मुशेत - मापगाव रस्त्यावरील मुशेत पुलावरून रेवस, बेलवले, बहिरोळे, मापगाव, कनकेश्वर, कार्लेखिंड मार्गावरील वाहनांची सातत्याने वाहतूक होत असून अवजड वाहनाच्या वाहतूकीमुळे सदर पूल वाहतूकीच्या दृष्टीने धोकादायक झाला असल्याने या पूलाच्या गाळ्यावर १२ फूट रूंदीचा लोखंडी पत्रा बसवून वाहतूक करण्यात येत असल्याची तक्रार संबंधीत विभागाकडे दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील वाघोडे गावाला जोडणाऱ्या नदीवरील पूलाचे सागरगड डोंगर रांगेमध्ये माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान ढगफुटी होवून झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून पूल नादुरूस्त झाला असल्याने अपघात घडून जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील या दोन्ही पुलांचे शासनाने स्ट्रक्चरल ऑडीट केले आहे काय,
(४) असल्यास, स्ट्रक्चरल ऑडीटचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या दोन्ही ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारची तक्रार प्राप्त नाही. तथापि, सदर पुल नादुरुस्त  झाला असून त्यावर कोणत्याही प्रकारची अवजड वाहतूक करु नये याबाबत नामफलक लावण्यात आलेला आहे.

(२) वाघोडे गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर एक लहान पुल व एक स्लॅब ड्रेन आहे. पैकी लहान पुल सुस्थितीत असून वाघोडे गावाजवळील स्लॅब ड्रेन नादुरुस्त झालेला आहे. अतिवृष्टीमुळे स्लॅबड्रेनचे दगडी ॲबटमेंट नादुरुस्त झाल्याने तात्पुरती डागडुजी करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत वाहतुक सुरु आहे.

(३) व (४) सदर पुलाची स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे.

(५) वाघोडे गावाला जोडणाऱ्या रस्त्यावरील स्लॅबड्रेनची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून प्रत्यक्ष जागेवर आवश्यक असणाऱ्या संरक्षक भिंती व नवीन स्लॅबड्रेनची पुनर्बांधणी या कामाचे रु १५.०० लक्षचे काम सन २०१७-१८ जिल्हा नियोजन विभागाकडे ५०५४ साकव बांधणे या कार्यक्रमातून मंजूरीसाठी जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आले आहे.

तसेच मुशेत पूलाचे बांधकाम नाबार्ड-२२ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

-----------------

## औरंगाबाद शहरातील आरोग्य संकुल इमारतीच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(४८) * ९०८०३ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील महावीर चौकात आरोग्य संकुल इमारतीच्या तळमजला आणि तीन मजले बांधकामासाठी ५ कोटी, ४३ लाख रुपयांचा निधि मंजूर झाला असून या इमारतीचे केवळ दोनच मजले बांधण्यात आले असल्याने सदर कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे उदघाटन न करताच माहे जानेवारी, २०१४ मध्ये आरोग्य उपसंचलाकाचे कार्यालय या इमारतीत स्थलांतरीत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या इमारतीच्या बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर इमारतीच्या बांधकामात गैरव्यवहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

औरंगाबाद येथील आरोग्य संकुल इमारतीच्या तळमजला आणि दोन मजले बांधकामासाठी रु.२७० लक्ष रकमेस सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.१०/११/२००६ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकातील वावाप्रमाणे सदर इमारतीचे तळमजला आणि दोन मजले बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

तिसऱ्या मजल्याच्या बांधकामास दि.२/११/२०११ अन्वये रु.२६३.२६/- लक्ष रकमेस सार्वजनिक आरोग्य विभागाने स्वतंत्र प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सदर कामावर रु.११४.१७ लक्ष खर्च करण्यात आलेला असून उर्वरित निधी रु.१४९.०९/- लक्ष उपलब्ध नसल्याने तिसऱ्या मजल्याचे बांधकाम स्थगित आहे.

(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राधानगरी (जि.कोल्हापूर) अभयारण्याशेजारील शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्य प्राण्यांकडून नुकसान होत असल्याबाबत

**(४९) * ८७०५४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) अभयारण्याशेजारील शेतकऱ्यांच्या पिकांचे गवा, रेडे, वानर, हत्ती, राणडुक्कर, मोर, या वन्य प्राण्यांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने वन्य प्राण्यांकडून होणाऱ्या नुकसानीचा समावेश पिक

विमा योजनेत करण्याची मागणी मा.कृषि मंत्री यांचेकडे दिनांक ०३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्य प्राण्यांकडून होणाऱ्या नुकसानीस वन विभागाकडून तुटपुंजी मदत मिळत असल्याने वन्यप्राण्यांकडून होणारी नुकसान भरपाई वाढविण्याची मागणी शेतकरी करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन्याप्राण्यांकडून होणाऱ्या नुकसान भरपाईचा समावेश पिक विमा योजनेत करण्याबाबत व नुकसान भरपाईची रक्कम वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.
(२) वन विभागाच्या दि.२५.७.२०१७ च्या टिप्पणीनुसार अशा प्रकारची निवेदने वन विभागाकडे प्राप्त झाली होती हे खरे आहे.
(३) प्रधानमंत्री पिक विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिक नुकसानीस प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत विमा संरक्षण अनुज्ञेय नाही.

तथापि, महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.९.७.२०१५ व दि.२३.१२.२०१५ अन्वये वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या शेती पिकांच्या व फळपिकांच्या नुकसानी पोटीच्या आर्थिक मदतीच्या दरात वाढ करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पांढरकवडा (जि.यवतमाळ) अंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(५०) * ९०८४५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पांढरकवडा अंतर्गत वणी (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीला संरक्षण भिंत बांधणाऱ्या कंत्राटदाराला कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता यांनी संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरु होण्यापूर्वीच ४० लाखांची देयके अदा केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुणवत्ता नियंत्रण पथक, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी सदर कामाची चौकशी करून ४० लक्ष रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार बनावट देयके काढणाऱ्या संबंधित अधिकारी तसेच कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ (सा.बां.) यांच्या अहवालावरुन बांधकाम सुरु होण्यापूर्वी देयक अदा केले नसून प्रत्यक्ष झालेल्या बांधकामाची किंमत रु. १०,०४,००६/- ऐवजी रु.४१,३५,४६६/- म्हणजेच रु.३१,३१,४६०/- इतक्या रकमेचे अतिप्रदान केल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, अमरावती यांनी या प्रकरणी चौकशी केली असून संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द दोषारोप तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच संबंधित कंत्राटदाराकडून व्याजासहित दि.२०/०४/२०१७ रोजी रु.३६,६५,०००/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी व कुर्ला (मुंबई उपनगर) येथील अवैध वाळू उपसा

**(५१) * ८९९७५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी व कुर्ला (मुंबई उपनगर) येथील वर्सोवा, मढ, गारोई, मार्वे भागात रात्री व पहाटेच्या सुमारास अवैध वाळू उपसा होत असल्याच्या ७२ तक्रारी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयात प्राप्त झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने सदर तालुक्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करुन सदर ठिकाणचा अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय कृषी विमा योजनेची थकीत रक्कम शेतकऱ्यांना वितरीत करण्याबाबत

**(५२) * ८६५९४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विमा योजने अंतर्गत राज्यातील २६ लाख ८८ हजार शेतकऱ्यांचे ८९३ कोटी रूपये थकीत असल्याची बाब दिनांक ०७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय कृषी विमा योजने अंतर्गत थकीत असलेली रक्कम शेतकऱ्यांना त्वरित वितरीत करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास कृषि संचालक, पुणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यानुसार राष्ट्रीय कृषि विमा योजनेतून शेतकऱ्यांची थकीत असलेली ८९३ कोटी रूपये त्वरित वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी हंगाम २०१५-१६ अंतर्गत ३४.२६ लाख शेतकऱ्यांनी रु ६२.४० कोटी विमा हप्ता भरुन योजनेत भाग घेतला होता. त्यापैकी २६.८८ लाख शेतकरी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नुकसान भरपाईस पात्र ठरले. रु ८९३.८३ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली. मार्च २०१५ मध्ये विमा कंपनीमार्फत सदरची नुकसान भरपाई रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करणेस्तव संबंधीत बँकांकडे वर्ग करण्यात आलेली आहे.
(२) होय
(३) नुकसान भरपाईची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हाळफाटा ते नावंढेवाडी (ता.खालापूर, जि.रायगड) रस्त्याची झालेली दुरवस्था

**(५३) * ८८८४० श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील हाळफाटा ते नावंढेवाडी हा संपूर्ण रस्ता खचुन रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता खचून रस्त्याची दुरवस्था झाल्याने शाळकरी विद्यार्थी तसेच जनतेला प्रवास करणे गैरसोयीचे होत असल्याने स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग

यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये तसेच यापूर्वी वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, पाहणीच्या अनुषंगाने रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

सदर रस्ता खचलेला नसुन रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग क्षतिग्रस्त झाला आहे.
(२) निवेदन प्राप्त आहे.
(३) प्रश्नांकीत रस्त्याची सुधारणा व मजबुतीकरणाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे. या कामाच्या निविदेतील दोषदायित्व कालावधी संपल्यावर मार्च-२०१७ मध्ये रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत केला आहे. या रस्त्याची पहाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी केली आहे.
(४) व (५) या पहाणीत रस्ता काही लांबीत मोठया प्रमाणात क्षतिग्रस्त झाला असल्याचे निष्पन्न झाले. या भागातील रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या कामाची निविदा प्रक्रीया सुरु आहे. सद्यस्थितीत रस्त्याची आवश्यक तातडीची दुरुस्ती करुन रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली आहे.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये बळीराजा चेतना अभियानांतर्गत झालेला गैरव्यवहार

**(५४) * ९१९४३ श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्याला बळीराजा चेतना अभियानांतर्गत मंजूर झालेल्या ५५० कोटी रुपयांच्या निधीपैकी शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी विभागाला प्राप्त झालेला ३ कोटी, ७५ लक्ष रुपयांचा निधी खर्च करुनही मागील दोन वर्षात उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण ३२५ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बळीराजा चेतना अभियानामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी स्थानिक शेतकऱ्यांनी केल्याचे निदर्शनास आल्यामुळे उर्वरित निधी लवकरात लवकर वितरीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांचेकडे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बळीराजा चेतना अभियांनांमध्ये झालेल्या गैरव्यवहारची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत व उक्त योजनेतील उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.

(२) होय.

(३) वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या खर्चाचे सविस्तर लेखापरिक्षण करण्यासाठी लेखाधिकारी खर्च (अलेपप) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) परिसरातील रिलायन्स कंपनीच्या अनधिकृत ब्लास्टींगमुळे ग्रामस्थांच्या मालमत्तेचे झालेले नुकसान

**(५५) * ८८२१० श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) परिसरातील रिलायन्स कंपनीच्या अनधिकृत ब्लास्टींगमुळे शिहू व बेणसे (ता.पेण, जि.रायगड) येथील ग्रामस्थांच्या मालमत्तेचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या ब्लॉस्टींगमुळे परिसरातील ग्रामस्थांच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याबाबतचा अहवाल संबंधीत तलाठ्याने वरिष्ठांकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने सदर कंपनी विरूध्द कारवाई करून शिहू व बेणसे येथील ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) संबंधीत तलाठी यांनी अहवाल सादर केला आहे.
(३) ग्रामस्थांच्या मालमत्तेचे नुकसान झालेले नसल्याने भरपाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राधानगरी व भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ऊसाच्या पिकावर हुमणी किडीचा झालेला प्रादुर्भाव

**(५६) * ८७४०० श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी व भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील नदी काठावरील ऊसाच्या पिकांवर हुमणी किडीचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळावी याकरीता मा.कृषि मंत्री यांच्याकडे दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील बहुतांशी पिकांवर हुमणी किडीचा प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असताना कृषि विभागाने याबाबत कोणतीही उपाययोजना केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील हुमणी किड बाधीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व हुमणी किडीवर नियंत्रण आणण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, त्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) नाही, तथापि भुदरगड तालुक्यात हुमणी किडीमुळे १४५ हे क्षेत्र प्रादुर्भावित झाले आहे तसेच राधानगरी तालुक्यात हुमणी किडीमुळे ३६० हे. क्षेत्र प्रादुर्भावित झाले आहे. सदर दोन्ही तालुक्यातील नुकसानीची तीव्रता ५ ते ६ टक्के आहे.

सदर प्रादुर्भावित गावांमध्ये शेतकरी मेळाव्याचे आयोजन करुन कृषि विद्यापिठाचे शास्त्रज्ञांमार्फत शेतकऱ्यांना हुमणी किडीच्या प्रादुर्भावाची लक्षणे, वेगवेगळया अवस्था व त्यावरील जैविक आणि रासायनिक उपाययोजनेबाबत मार्गदर्शन केले आहे तसेच क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत हुमणी किडीवरील एकात्मिक किड व्यवस्थापन माहितीपत्रकाच्या प्रती वाटप करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शनानुसार शेतकऱ्यांनी स्वत: हुमणी किडीवरील औषधांची खरेदीकरुन तात्काळ उपाययोजना केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.